P.R.O Office ,Crime Branch ,Pimpri Chinchwad
Address:- Office Of The Commissioner Of Police ,
Premlok Park Chinchwad,
Maharashtra - 411033

# प्रेसनोट दिनांक – १४/१०/२०२४

**दि. १३/१०/२०२४ रोजी रात्रौ ००.०० वा ते २४.०० वा पर्यत दाखल गुन्हे**

**भाग १ ते ५ चे गुन्हे**

०१.

पोस्टे व गु रजि.नं. :- वाकड **(काळेवाडी)**१०९५ /२०२४ भारतीय न्याय संहिता कायदा कलम १०३(१), ६१(२),२३८, १८९(२), १८९(४),१९१(२),१९१(३),१९० सह भारतीय शस्त्र अधिनियम १९५९ चे कलम ४ (२५) ४(२७), ३५ म. पो.का.क.३७(१)(३)/१३५ प्रमाणे

गु.घ.ता.वेळ व ठि. :- १२/१०/२०२४ रोजी २०/०० वा.ते दि.१३/१०/२०२४ रोजी सकाळी ०८/०० वा.चे दरम्यान मौजे जगताप नगर, थेरगाव पुणे

गुन्हा दाखल :- १३/१०/२०२४ रोजी १७/२४ वा

फिर्यादी :- महिला फिर्यादी, वय-३५ वर्ष, धंदा- घरकाम रा.बौध्द नगर, गिरीजु बाबा मंदीराचे पाठीमागे, झोपडपट्टी, पिंपरी पुणे-१७

आरोपी :- १)अरुण परदेशी वय- अंदाजे १९ वर्ष रा.काळेवाडी पुणे
२)यश भगवान रोकडे वय- अंदाजे २० वर्ष रा.बौध्दनगर, पिंपरी पुणे
३)अशपाक दिलशाद शेख वय- अंदाजे २१ वर्ष रा.एम.आय.डी.सी. पाण्याचे टाकी शेजारी, बौध्दनगर, पिंपरी पुणे ४)प्रथमेश विष्णु हजारे वय- अंदाजे २२ वर्ष रा.बिल्डींग नं.१६, बौध्दनगर, पिंपरी पुणे
५)ओमकार कामत वय- अंदाजे २४ वर्ष (गळयावर टॅटयु असलेला) पत्ता माहिती नाही
६)लक्ष्मण कोळी वय- अंदाजे २० वर्ष रा.एम.आय.डी.सी. पाण्याचे टाकी शेजारी, बौध्दनगर, पिंपरी पुणे
७)साहिल वय- अंदाजे २१ वर्ष पुर्ण नाव पत्ता माहिती नाही (हातावर टॅटयु असलेला) व त्यांचे इतर साथीदारांनी **आरोपी अटक नाही**

तपशिल :- नमद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादी यांचा मुलगा साहिल राहुल साबळे ,वय १८ वर्षे, रा.बौध्द नगर, गिरीजु बाबा मंदीराचे पाठीमागे, झोपडपट्टी, पिंपरी पुणे-१७ याने गणेश ऊर्फ दादु शांताबाई रोकडे याचा खुन केला होता. त्याचा राग मनात धरुन व त्याचा बदला घेण्याचे उद्देशाने कट रचुन आरोपीत यांनी संगणमत करुन फिर्यादीचा मुलगा साहिल राहुल साबळे यास जगताप नगर थेरगाव येथे तोंडावर धारदार हत्याराने वार करुन व दगडाने ठेचुन त्याचा खुन केला आहे म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- सपोनि निलेश नलवडे वाकड पोलीस ठाणे मो नं ९५५२५२०१९३

०२.

पोस्टे व गु रजि.नं. :- महाळुंगे एमआयडीसी ६९१/२०२४ बी.एन.एस. कलम १०९, ११८ (१), ३(५), आर्म ॲक्ट ३/२५ क्रिमीनल लॉ ॲमेन्टमेन्ट ॲक्ट ३, ७ व महा. पोलीसकायदाकलम ३७ (१) (३)/१३५ प्रमाणे

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.१२/१०/२०२४ रोजी रात्री १०/१५ वा. सुमारास महाळुंगे भैरवनाथ मंदिरच्या बाजुला, असलेलेछावा प्रतिष्ठान मित्र मंडळ महाळुंगे येथेता.खेड जि.पुणे

गुन्हा दाखल :- दि.१३/१०/२०२४ रोजी०७/३२ वा

फिर्यादी :- सुरज गणपत कदम वय ३० वर्षे धंदा रिक्षा चालक रा. जावळेवस्ती, महाळुंगे इंगळे ता. खेड जिल्हा पुणे.

आरोपी :- सौरभ मुळे वय अंदाजे २७ वर्ष रा महाळुंगे ता.खेड जि.पुणे
व त्याचे दोन मित्र (नाव पत्ता माहीत नाही.) **आरोपी अटक नाही**

तपशिल :- नमुद तारखेस वेळी व ठिकाणी नवरात्र उत्सव व दांडीया तसेच गरभा चा कार्यक्रम सुरु असताना यातील आरोपी याने शंकर यांच्या मुलाला गरभ्यातुन कॉलर पकडुन बाहेर काढल्याचे कारणावरून शंकर नवगणे व आरोपी क्रं १ यांचे भांडण झाले होते. त्यानंतर थोड्या वेळाने शंकर याची पत्नी व आरोपी क्रं १ यांची आई यांचे सदर ठिकाणी भाडंण झाले म्हणुन दांडीयाचा कार्यक्रम बंद केल्यामुळे तेथील महीलांनी आरोपी क्रं १ याच्या सोबत भांडण करून

आमच्या भागात राहत असुन आमच्यावर दादगीरी करतो का असे बोलुन त्याला हाताने, बुक्यानी व चपलांनी मारहान केली. त्याला मारहान केल्यामुळे आरोपी क्रं १ याचे सोबत असलेल्या दोन इसमापैकी एका इसमाने निलेश असाटी याला जिवे मारण्याच्या उद्देशाने त्याच्या जवळ असलेल्या पिस्टलने फायर करून त्याच्या छातीवर गोळी मारून गंभीर जखमी केले. तसेच आरोपी क्रं १ याचे सोबत असलेल्या दुस-या इसमाने फिर्यादी यांचे डोक्यावर विट मारून फिर्यादीस दुखापत केली व ते तिथुन हवेत गोळीबार करून दहशत माजवुन पळुन गेले म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- श्री.नितीन गिते वरिष्ठ पोलीस निरीक्षक

०३.

पोस्टे व गु रजि.नं. :- चाकण ७१९/२०२४ भारतीय न्याय संहिता का कलम ३१०(२), ३११ प्रमाणे

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि. १३/१०/२०२४ रोजी रात्रौ ०२.४० वा. च्या सुमारास शेलपिंपळगाव, ता. खेड, जि. पुणे येथे

गुन्हा दाखल :- दिनांक १३/१०/२०२४ रोजी ०९.०१ वा

फिर्यादी :- अनिकेत पंडीत दौडकर, वय - २५ वर्षे, व्यवसाय - नोकरी, रा. शेलपिंपळगाव, ता. खेड, जि. पुणे

आरोपी :- सहा अज्ञात चोरटे व इतर तीन अनोळखी **आरोपी अटक नाही**

तपशिल :- नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील सहा अनोळखी चोरट्यांनी फिर्यादी यांचे शेलपिंपळगाव, ता. खेड, जि. पुणे येथिल राहाते घरातील ४२,५००/- रू. किंमतीचे १७ ग्रॅम वजनाचे सोन्याचे एक मंगळसूत्र व १२,५००/- रू. किंमतीची ५ ग्रॅम वजनाची एक सोन्याची अंगठी असे एकुन ५५,०००/- रू. किमंतीचे सोन्याचे दागिने जबरीने चोरून घेऊन जातेवेळी फिर्यादी हे एका चोरट्याला पकडत असताना त्यातील इतर दोन चोरट्यांनी फिर्यादीवर कोयत्यासारखे धारदार शस्त्रांनी वार करून त्यांना जखमी करून दरोडा टाकुन निघुन गेलेले आहे म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- सपोनि ज-हाड ८३०८०७८९००

०४.

पोस्टे व गु रजि.नं. :- पिंपरी (संत तुकाराम नगर)९०६/२०२४ भा.न्या.सं कायदा २०२३ चे कलम ३०९(४),३(५)

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.१२/१०/२०२४ रोजी रात्रौ २१/५ वा चे सुमारास संतोषी माता चौकातुन यशवंत नगरकडे जाणा-या रोडवर प्रियदर्शनी शाळेसमोर, नेहरूनगर पिंपरी

गुन्हा दाखल :- दि.१३/१०/२०२४ रोजी ०२.३६ वा.

फिर्यादी :- महिला फिर्यादी, वय ५५ वर्षे, धंदा गृहीणी, रा. अजमेरा, नेहरूनगर पिंपरी पुणे

आरोपी :- एक काळया रंगाच्या ॲक्टीवा गाडीवरील दोन अनोळखी इसम
**आरोपी अटक नाही**

तपशिल :- नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हे त्यांची मैत्रीण यांचेसह दस-या निमीत्त निघालेल्या देवीच्या मिरवणूका पाहून राहते घरी प्रियदर्शनी शाळेसमोरून पायी जात असताना त्यांचे समोरून विरूध्द दिशेने येणा-या एका काळया रंगाच्या नंबर माहीत नसलेल्या ॲक्टीवा गाडीवरून दोन अनोळखी इसमांनी येवून फिर्यादी यांचे गळयातील ६,३०,०००/- रु किं चे ९ तोळे वजन असलेले मंगळसुत्राची चैन जबरदस्तीने हिसकावून चोरी करून घेवून निघून गेले आहेत. म्हणून

त.अधिकारी/अंमलदार :- गणेश आटवे पोलीस उप निरीक्षक पिंपरी पो.स्टे.पिं.चिं.मो.नं.९८८१८७०४२३

०५.

पोस्टे व गु रजि.नं. :- पिंपरी ९०८/२०२४ भा. न्या. संहिता २०२३ चे कलम ११५(२), ११८(१), ३५१(३)प्रमाणे

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.११/१०/२०२४ रोजी २०.०० ते २१.०० वा. चे दरम्यान गेलार्ड चौक हॉंगकॉंग स्पोर्ट टॉईज या दुकानात पिंपरी पुणे

गुन्हा दाखल :- दि.१३/१०/२०२४ रोजी २०.३६ वा

फिर्यादी :- अनिल गोपिचंद केसवाणी वय ३६ वर्षे व्यवसाय व्यापार रा. प्लॅट नं. १६ श्री गणेश कपा अपार्टमेंट साई चौक

पिंपरी पुणे

आरोपी :- जयप्रकाश हरीष वासवाणी (पत्ता माहीत नाही) **आरोपी अटक नाही**

तपशिल :- नमुद केले ता. वेळी व ठिकाणी यातील आरोपी मजकुर याने यातील फिर्यादी यांच्या मुलास चोरी केल्याचे समजुन हाताने कानाखाली गालावर व डोळ्यावर मारहाण केली. त्यानंतर लाकडी बॅटने फिर्यादी यांच्या मुलाच्या पाटीवर दुखापत करुन, तु जर घरी सांगितलेस तर तुला जिवे मारुन टाकतो अशी धमकी दिली म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- एस.टी. रेंगडे श्रेणी पोलीस उप निरीक्षक ८७८८०५६०८२

०६.

पोस्टे व गु रजि.नं. :- चाकण ७२०/२०२४ भारतीय न्याय संहिता का कलम २८१, १०६(१),३२४(४), ३२४(५)मो.वा.का.क.१८४ प्रमाणे

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.१३/१०/२०२४ रोजी सकाळी ०८/०० वा च्या सुमारास बीरदवडीफाटा पुणे नाशिक हायवे रोड जवळ ता खेड जि पुणे येथे

गुन्हा दाखल :- दि.१३/०७/२०२४ रोजी १८.४४ वा

फिर्यादी :- ओंकार बाजीराव कुलाळ ,वय २० वर्षे रा राक्षेवाडी चाकण ता खेड ,जि पुणे ,मुळ रा गेवराई ता गेवराई जि बीड

आरोपी :- पीकअप गाडी नं एम.एच.०१/बी.एस ०२६० वरील चालक नाव पत्ता माहीत नाही

तपशिल :- नमूद तारीख वेळी व ठिकाणी बीरदवडीफाटा पुणे नाशिक हायवे रोडजवळ ता खेड जि पुणे येथुन मयत नामे मनोज सैनी वय २८ वर्षे रा पजे वस्ती वाकी ता खेड जि पुणे हे त्यांच्या ताब्यातील मोसा नं एम.एच.१२/क्यु.जी ८०३७ हीचेवरुन पुणे नाशिक रोडकडुन बीरदवडी कडे जात असताणा बीरदवडी कडुन पुणे नाशिक रोडकडे येणारी पीकअप गाडी नं एम.एच.०१/बी.एस.०२६० वरील चालकाने त्याच्या ताब्यातील पीकअप गाडी अविचाराने, हयगयीने वाहतुकीच्या नियमांकडे दुर्लक्ष करुन भरधाव वेगात चालवुन यातील मयत मनोज याचे गाडीस धडक देऊन अपघातात गंभीर जखमी करुन त्याच्या मरणास कारणीभुत होउन मोसा चे नुकसान करुन अपघात ठिकाणावरुन पीकअप गाडी सोडुन निघुन गेला आहे .म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- मसपोनि गावडे ९८७०५४८०४३